(इंग्रजीमध्ये टंकलिखित न्यायनिर्णयाचा मराठी भाषेत अनुवाद.)

**मुंबई येथील उच्च न्यायालयाच्या अधिकारितेमद्धे**

**दिवाणी अपिलीय अधिकारिता**

**दिवाणी पुनरीक्षण अर्ज क्रमांक ८४१ /२०१४**

अनमोल ड्रेसेस च्या मार्फत

१. चंदूलाल मोतीलाल शाह ... अर्जदार

२. हितेश मोतीलाल शहा (मूळ प्रतिवादी)

विरुद्ध

राजाराम अनंत चिपाडे, मयत

त्याचे वारसदार - कायदेशीर प्रतिनिधी मार्फत :-

१ए दिपक राजाराम चिपाडे

१बी प्रफुल्ल राजाराम चिपाडे ... उत्तरवादी

---

*श्री. एस. एस. पटवर्धन सोबत श्री. चेतन जी. पाटील आणि श्री. भूषण आर. मांडलिक यांनी अपीलकर्त्यांसाठी काम पाहिले.*

*श्री. अशोक धानुका सोबत श्री. हितेश गुप्ता व श्री. पवन तिवारी यांनी उत्तरवादींनसाठी काम पहिले.*

**न्यायमंच : न्या. संदीप व्ही. मारणे**

**न्यायनिर्णय राखून ठेवलयाचा दिनांक : १४ डिसेंबर २०२४**

**न्यायनिर्णय घोषित केल्याचा दिनांक : २० डिसेंबर २०२४**

**न्यायनिर्णय:**

१) विद्वान प्रधान जिल्हा न्यायाधीश, कोल्हापूर यांनी नियमित दिवाणी अपील क्रमांक २२५/२००४ फेटाळत आणि विद्वान तृतीय दिवाणी सह न्यायाधीश कनिष्ठ स्थर, कोल्हापूर, यांनी दिलेल्या १५ एप्रिल २००४ च्या निर्णयाला आणि आदेशाला कायम करत, ज्याद्वारे नियमित दिवाणी दावा क्रमांक २५८/२०२२ मध्ये हुकूमनामा देण्यात आला आहे, दिलेल्या दिनांक ७ जुलै २०१४ रोजी पारित केलेल्या न्यायनिर्णय आणि हुकूमनाम्याला आव्हान देणारा हा अर्ज अपिलकर्त्यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ (संहिता) च्या कलम ११५ मधील तरतुदींनुसार दाखल केला आहे. पुनरीक्षण अर्जदार/प्रतिवादींना संहितेच्या आदेश २० नियम १२ अंतर्गत दरम्यानच्या नफ्याची चौकशी करण्यासाठी पुढील निर्देश देऊन दावा जागेचा ताबा वादीकडे सोपविण्याचे निर्देश दिले जातात.

२) कोल्हापूर येथील महाद्वार रोडवरील 'ए' वॉर्डातील घर क्रमांक ३१००/१-ए, ६०० चौरस फुटांचे दुकान 'दावा जागा' आहे. वादी/उत्तरवादी दावा करतात की ते दावा जागेचे मालक आहेत, ज्यामध्ये प्रतिवादींना रु.२,000/-च्या मासिक भाड्याने कपड्यांचा व्यवसाय करण्यासाठी मासिक भाडेकरू म्हणून राहण्यास दिले गेले होते. वादी यांनी ७ मार्च २००२ रोजी कोल्हापुरातील तृतीय दिवाणी सहन्यायाधीश यांच्या न्यायालयात नियमित दिवाणी दावा क्रमांक २५८/२००२ दाखल करून स्वत:च्या व आपल्या दोन मुलांच्या खऱ्याखुऱ्या गरजेच्या कारणास्तव दावा जागेचा ताबा मिळावा, अशी मागणी केली. आपले कुटुंब तीन पिढ्यांपासून दागिन्यांच्या व्यवसायात असून वादी व त्यांच्या दोन मुलांकडे स्वतंत्र व्यवसाय करण्यासाठी कोणतीही जागा नसल्याचा युक्तिवाद वादीने केला. कोल्हापुरातील गुजरी येथील 'केशव मार्तंड चिपाडे' या भागीदारी संस्थे मध्ये वादीचा केवळ १/६ वाटा होता. वादीला स्वत:साठी तसेच आपल्या दोन मुलांसाठी दावा जागेत स्वतंत्र व्यवसाय सुरू करायचा होता. दावा जागेत सामायिक भिंतीने विभागलेली १५० चौरस फुटांची जागा आपल्या ताब्यात असल्याचा युक्तिवाद वादीने केला. त्यांचा मोठा मुलगा दिपक चिपाडे हा १५० चौरस फुटांच्या या छोट्याशा दुकानात दागिन्यांचा व्यवसाय करत होता. वादीला सामाईक भिंत पाडून ७५० चौरस फुटांच्या संयुक्त दुकानांमध्ये शोरूम सुरू करायचे होते.

३) वादी यांची कोल्हापूर शहरात संयुक्त कुटुंबात ३ ते ४ दागिन्यांची दुकाने असून दागिन्यांच्या व्यवसायातून ते प्रचंड उत्पन्न मिळवत असल्याचे लेखी कथन प्रतिवादींनी दिले होते. वादी कोल्हापूर शहरातील सर्वाधिक कर भरणाऱ्या ज्वेलर्सपैकी एक होता. त्यांच्या कुटुंबाकडे तब्बल ११ व्यावसायिक आणि निवासी मालमत्ता होत्या. सन १९६९ मध्ये दावा जागेसंदर्भात मोठ्या प्रमाणात पगडी (अनामत रक्कम) भरून भाडेदारी (भाडेकरु म्हणून जागा ताब्यात ठेवण्याचा व वापरण्याचा हक्क) मिळवल्यानंतर प्रतिवादी अनमोल ड्रेसेस या नावाने तयार कपड्यांचा व्यवसाय करीत होते. वादीच्या ताब्यातील शेजारचे दुकान ३०० चौरस फूट आहे, असा युक्तिवाद त्यांनी केला. त्यानुसार प्रतिवादींनी दावा फेटाळण्याची विनंती केली.

४) या युक्तिवादांच्या आधारे न्यायचौकशी न्यायालयाने वादप्रश्न तयार केले. पक्षकारांनी आपापल्या दाव्याच्या समर्थनार्थ साक्षीपुरावे दिले. वादी यांच्या वतीने वादी यांची सून सुलभा चिपाडे यांची सरकारी साक्षीदार (स.सा.) १ म्हणून तपासणी करण्यात आली. वादींनी अनिल सूर्यवंशी यांचीही आपल्या दाव्याच्या समर्थनार्थ तपासणी केली. प्रतिवादींनी आपली बाजू मांडण्यासाठी हितेश मोतीलाल शहा, दत्तात्रय एन. साळोखे, शहाजी साळोखे आणि प्रवीण पाटील यांची तपासणी केली. युक्तिवाद, कागदोपत्री आणि तोंडी पुराव्यांचा विचार करून न्यायचौकशी न्यायालयाने १५ एप्रिल २००४ रोजी

पारित केलेल्या न्यायनिर्णय आणि आदेशाद्वारे दाव्यात हुकूमनामा दिला. दावा जागा त्यांना आणि त्याच्या कुटुंबाला आवश्यक आहे, हे वादीने सिद्ध केले आहे, असे न्यायचौकशी न्यायालयाने म्हटले आहे. दावा जागे संदर्भात वादी यांनी आपला मुलगा प्रफुल्ल याची खरीखुरी आवश्यकता सिध्द्ध केली, असे न्यायचौकशी न्यायालयाने म्हटले आहे. तुलनात्मक अडचणींचा मुद्दा वादीच्या बाजूने आणि प्रतिवादीच्या विरोधात ठेवण्यात आला. त्यानुसार न्यायचौकशी न्यायालयाने प्रतिवादींना संहितेच्या आदेश २० नियम १२ अन्वये दरम्यानच्या नफ्याची चौकशी करण्याचे पुढील निर्देश देऊन जागेचा ताबा वादीकडे सोपविण्याचे निर्देश दिले.

५) कोल्हापूर येथील प्रधान जिल्हा न्यायाधीशांच्या न्यायालयात प्रतिवादींनी २००४ चा आर.सी.ए.क्र.२२५ दाखल केला. मात्र, ७ जुलै २०१४ रोजीचा न्यायनिर्णय व हुकूमनाम्याद्वारे विद्वान प्रधान जिल्हा न्यायाधीशांनी न्यायचौकशी न्यायालयाने दिलेल्या आदेशावर शिक्कामोर्तब करून अपील फेटाळून लावले आहे. न्यायचौकशी न्यायालयाने दिलेल्या बेदखलीच्या हुकूमनाम्याला कायम करण्याऱ्या अपीलीय न्यायालयाच्या आदेशाने व्यथित झालेल्या प्रतिवादींनी सध्याचा पुनरीक्षण अर्ज दाखल केला आहे. १८ सप्टेंबर २०२४ च्या आदेशाद्वारे या न्यायालयाने हा अर्ज स्वीकारला आणि बेदखलीच्या आदेशाच्या अंमलबजावणीला स्थगिती देण्याचा अंतरिमकालीन दिलासा दिला. २५

एप्रिल २०१७ च्या आदेशाद्वारे या न्यायालयाने दावा जागे संदर्भात जानेवारी २०१७ पासून देय असलेल्या दरमहा रु. २०,०००/- दराने अंतरिम नुकसान भरपाई निश्चित केली आहे. ७ ऑगस्ट २०१९ च्या आदेशाद्वारे न्यायालयाने दिपक  राजाराम चिपाडे यांना जमा अंतरिम नुकसान भरपाईच्या ५० टक्के रक्कम काढण्याची परवानगी दिली. ही याचिका अंतिम सुनावणीसाठी पुकारण्यात आली आहे.

६)   याचिकाकर्त्याची बाजू मांडणारे विद्वान वकील श्री. पटवर्धन हे सादर करतात की, न्यायचौकशी न्यायालयाने  आणि अपीलीय न्यायालयाने खऱ्याखुऱ्या आवश्यकतेच्या आधारावर वादीचा दाव्यात हुकूमनामा देण्यात चूक केली आहे. ते असा युक्तिवाद करतात  की वादी स्वत: किंवा त्याच्या कोणत्याही मुलाने साक्षीदाराच्या कठड्यात पाऊल ठेवले नाही आणि त्यांच्या कथित खऱ्याखुऱ्या आवश्यकतेचे समर्थन केले नाही. तो वादी साक्षीपुरावा नोंदवून घेण्याच्या स्थितीत होता, परंतु अज्ञात कारणास्तव साक्षीदाराच्या कठड्या पासून दूर राहिला. दिपक  आणि प्रफुल्ल ही दोन्ही मुले, ज्यांची खरी गरज ही मांडण्यात आली होती, त्यांनी त्यांच्या कथित खऱ्याखुऱ्या आवश्यकतेच्या  समर्थनार्थ साक्षीपुरावे सादर केले नाहीत.  त्याऐवजी, साक्ष वादीचे प्रस्थापित मुखत्यार  कु. सुलभा चिपाडे यांनी दिली, जी वादी आणि त्यांच्या दोन मुलांच्या खऱ्याखुऱ्या आवश्यकतेचे साक्षीपुरावे देण्यास अक्षम होती.  त्यांनी हे सुद्धा दाखवून दिले की  न्यायचौकशी आणि

अपील न्यायालयाने *रामकुबाई (सौ.) मयत त्यांच्या कायदेशीर वारसदारांमर्फत आणि इतर वि. हजारीमल ढोकलचंद चांडक आणि इतर*[1] या प्रकरणावर विसंबून राहण्यात चूक केली आहे, ज्यामध्ये प्रस्थापित मुखत्यार पुत्र होता, ज्याच्या फायद्यासाठी व्यवसायाची उभारणी केली गेली होती आणि काहीही असो त्यातील अपीलकर्त्याने शेवटी खरीखुरी आवश्यकता मान्य केली होती. त्यामुळे रामकुबाई (उपरोल्लेखित) मधील न्यायानिर्णयाचा दाखला असा देता येणार नाही की, प्रत्येक प्रकरणात जिथे प्रस्थापित मुखत्यार जवळचा नातेवाईक असेल तर तो दाव्यातील पक्षकाराच्या वैयक्तिक माहितीतील बाबींशी संबंधित साक्षीपुरावे देण्यास सक्षम आहे. स. सा. १ -सुलभा व्यवसायाने वकील आहे आणि तिला दागिन्यांच्या व्यवसायाबद्दल कोणतीही माहिती नाही किंवा तिने तिच्या पती किंवा सासऱ्याच्या दागिन्यांच्या व्यवसायात भाग घेतला आहे असे तिचे प्रकरण नाही. म्हणूनच, स. सा. १ ला वादी किंवा त्याच्या दोन मुलांच्या खऱ्याखुऱ्या आवश्यकतेबद्दल कोणतीही वैयक्तिक माहिती असण्याचे कोणतेही कारण नव्हते . श्री. पटवर्धन हे जोडीदार पुरावा देऊ शकतो जर ती केवळ पतीच्या व्यवसायाची व्यवस्था पाहात होती, या आपल्या युक्तिवादाच्या समर्थनार्थ *मान कौर (मृत) कायदेशीर प्रतिनिधीन मार्फत वि. हरतार सिंग संघ*[2] या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या

---

1 (1999) 6 एससीसी 540

2 (२०१०) २० एससीसी ५१२

निर्णयावर अवलंबून राहिले. स. सा. १ केवळ तिच्या पतीचा व्यवसायाची व्यवस्था पाहात होती हे दर्शविण्यासाठी अभिलेखावर काहीही नाही. वस्तुतः तिला तिच्या वकिली व्यवसायामुळे पतीचा व्यवसाय सांभाळण्यास मनाई आहे. त्यांनी असे सादर निवेदन केले की न्यायचौकशी आणि अपीलीय न्यायालयाने स. सा. १ चे साक्षीपुरावे काढून टाकायला हवे होते आणि वादी किंवा त्याच्या दोन मुलांच्या साक्षीपुराव्या अभावी दावा फेटाळला गेला पाहिजे होता.

७) स. सा. १ ने नोंदवलेल्या साक्षीपुराव्यांच्या अस्वीकार्यते बद्दलच्या आक्षेपाला हानी न पोचवता, श्री. पटवर्धन सादर करतात की वादीने अन्यथा कोणत्याही प्रकारे खरी आवश्यकता सिद्ध केलीली नाही. न्यायचौकशी न्यायालयाने केवळ प्रफुल्लची खरी गरज मान्य केली होती आणि दिपकच्या कथित प्रामाणिक गरजेबद्दल कोणताही निष्कर्ष नोंदवला नव्हता, म्हणजेच दिपकची खरी गरज होती, हे खरे तर न्यायचौकशी न्यायालयाने फेटाळून लावली. अपीलीय न्यायालयाने वादीने कोणताही उलट आक्षेप न घेता दिपकची गरजही चुकीच्या पद्धतीने मान्य केली. खरे आवश्यकतेच्या मुद्द्यावर न्यायचौकशी आणि अपिलीय न्यायालयांनी नोंदवलेले निष्कर्ष स्पष्टपणे विकृतपणाच्या दुर्गुणाने ग्रस्त आहेत. वादी हे श्रीमंत व्यक्ती असून त्यांचे कोल्हापूर शहरात असंख्य दागिन्यांचे शोरूम असून भाडेकरूकडून मालमत्ता हडप करण्यासाठी आवश्यकतेचा खोटा गुन्हा दाखल केला आहे. वादीने मांडलेली गरज ही कल्पनामय इच्छे शिवाय काहीच

नाही, जी प्रतिवादींना बेदखल करण्याचे आदेश देऊन पूर्ण केली जाऊ शकत नाही, ज्यांना बेदखलीच्या आदेशामुळे अधिक त्रास सहन करावा लागेल.

८) श्री. पटवर्धन पुढे असे सादर करतात की, खोटा आरोप केल्याप्रमाणे शेजारची जागा प्रत्यक्षात ३०० चौरस फूट आहे आणि १५० चौरस फूट नाही आणि संबंधित वेळी दिपकच्या कथित दागिन्यांचा व्यवसाय करण्यासाठी पुरेसे होते. दिपकला सदर शेजारच्या जागेतून कधीच कोणताही व्यवसाय करायचा नव्हता, हे दिपक ने अखेर दुकान बंद केल्याने स्पष्ट होते. दिपक ने २०१७ मध्ये दागिन्यांचे दुकान बंद केल्याच्या युक्तिवादाच्या समर्थनार्थ हितेश मोतीलाल शहा यांनी दाखल केलेल्या अतिरिक्त प्रतिज्ञापत्राचा आधार ते घेत आहेत. ते असे सादर करतात की वीज वापर तसेच दुकान अधिनियम परवान्याचे नूतनीकरण न केल्याने वादी यांचा मुलगा दिपक शेजारच्या जागेत कोणताही व्यवसाय करीत नसल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे आक्षेपित बेदखलीचे आदेश रद्द करण्यात यावेत, अशी प्रार्थना करतात.

९) या याचिकेला मूळ वादीच्या उत्तरवादी/कायदेशीर वारसदारांचे वकील श्री. धानुका यांनी विरोध केला आहे. ते सादर करतात की न्यायचौकशी आणि अपीलीय न्यायालयाने वादी आणि त्याच्या दोन मुलांची खरी आवश्यकता मान्य करून वादीच्या दाव्यात योग्य हुकूमनामा दिला आहे. स. सा. १ -सुलभा वादीच्या प्रकरणाच्या समर्थनार्थ पुरावे सादर

करण्यास पूर्णपणे सक्षम होते. मूळ वादीची सून म्हणून तिचे नाते विवादग्रस्त नाही. दिपकची पत्नी असल्याने तिला कुटुंबाच्या व्यावसायिक गरजांचे वैयक्तिक ज्ञान असणे बंधनकारक होते. भागीदारी, जागेचे क्षेत्रफळ, कुटुंबाची आर्थिक स्थिती, मेहुण्याची बेरोजगारी इत्यादि विविध बाबींची सविस्तर साक्ष त्यांनी दिली आहे. कुटुंबातील एक सदस्य म्हणून तिने आपल्या वैयक्तिक ज्ञानात जे आहे ते उघड केले आहे. म्हणूनच, न्यायचौकशी आणि अपीललीय न्यायालयाने स. सा. १ च्या साक्षीपुराव्यांवर योग्य विश्वास ठेवला आहे. समर्थनार्थ ते जय प्रकाश त्यागी आणि अन्य वि. एमसीडी या प्रकरणातील दिल्ली उच्च न्यायालयाच्या निर्णयवर ते अवलंबून आहेत.

१०) श्री. धानुका पुदे असे सादर करतात की दावा जागेत दागिन्यांचा व्यवसाय करण्यासाठी वादी व त्यांच्या दोन मुलांची एकत्रित गरज यावर युक्तिवाद करण्यात आला आणि सिद्ध करण्यात आ ला. वादी तसेच त्यांच्या मुलाचा दागिन्यांच्या व्यवसायात सहभाग आहे, हे विवादग्रस्त नाही . शेजारच्या जागेत दिपक व्यवसाय करत आहे यावरही कधीच युक्तिवाद झाला नाही. त्याचप्रमाणे प्रफुल्ल यांची बेरोजगारीही विवादग्रस्त नाही. त्यामुळे केवळ संयुक्त कौटुंबिक व्यवसायावर अवलंबून न राहता आपल्या मुलांचा स्वतंत्र व्यवसाय उभा करणे साहजिकच होते. ते मला न्यायचौकशी आणि अपीलीय न्यायालयांनी नोंदवलेल्या निष्कर्ष वाचून दाखवतील आणि म्हणूनच

सुधारित अधिकारक्षेत्राचा वापर करताना या न्यायालयाच्या हस्तक्षेपाची कोणतीही आवश्यकता नाही. त्यांनी पुनरीक्षण अर्ज फेटाळण्याची प्रार्थना केली आहे .

११) पक्षांचे प्रतिस्पर्धी वाद आता माझ्या विचारार्थ येतात.

१२) वादीच्या दाव्यात हूकूमनामा घरमालकाच्या खऱ्याखुऱ्या गरजेच्या एकमेव कारणास्तव देण्यात आला आहे. वादपत्राचे अवलोकन केल्यास असे दिसून येईल की , वादीने सदर दुकान दावा जागेत एकत्रित करून स्वत:सह आपली दोन मुले दिपक आणि प्रफुल्ल यांना शेजारच्या दुकानात सुरू असलेल्या तत्कालीन लहान दागिन्यांच्या शोरूमचा आकार १५० चौरस फुटांवर वाढविण्याची विनंती केली आहे. अशाप्रकारे आपल्या दोन मुलांसह स्वत: स्वतंत्र दागिन्यांचा व्यवसाय सुरू करून ७५० चौरस फुटांचे मोठे शोरूम उघडण्याची वादीची इच्छा होती. वादीने कबूल केले की, तो दागिन्यांचा व्यवसाय करत होता, परंतु 'केशव मार्तंड चिपाडे' या कंपनीचा भागीदार म्हणून, ज्यात त्याचा १/६ वाटा होता. त्यामुळे त्यांचा मुलगा दिपक ज्या दुकानात व्यवसाय करत होता, त्या १५० चौरस

फुटांच्या अस्तित्वात असलेल्या छोट्या दागिन्यांच्या शोरूमचा विस्तार करण्याची खरीखुरी आवश्यतेसाठी वादीने विनंती केली होती. शेजारच्या दुकानाचे मोजमाप ३०० चौरस फूट असल्याचा युक्तिवाद करून प्रतिवादीने काही वाद निर्माण करण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते. मात्र, शेजारच्या दुकानाचे क्षेत्रफळ ३०० चौरस फूट असल्याचा दावा प्रतिवादींनी सिद्ध केला नसल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे शेजारच्या दुकानाचे क्षेत्रफळ १५० चौरस फूट घ्यावे लागणार आहे. वादी यांचे कुटुंब कोल्हापूर शहरातील ७ ते ८ दुकानांमध्ये तीन ते चार दागिन्यांचे शोरूम चालवते, असा युक्तिवाद करत प्रतिवादीने वादीची खरी गरज फेटाळून लावली. वादी शेजारच्या दुकानातून चांगला व्यवसाय करीत असून त्या दुकानातून चांगला नफा मिळत असल्याने त्यांनी नुकतेच त्याचे नूतनीकरण केले आहे, असा युक्तिवादही त्यांनी केला.

१३) वर निरीक्षण केल्याप्रमाणे वादी किंवा त्यांची मुले दिपक किंवा प्रफुल्ल यांनी साक्षीपुरावे सादर केले नाहीत.

त्याऐवजी वादी यांची सून आणि दिपक यांची पत्नी सुलभा दिपक चिपाडे यांनी साक्षीपुरावा सादर केला. श्री. पटवर्धन यांच्या युक्तिवादाचा मुख्य आधार सुलभा यांनी सासरे, पती आणि मेहुणे यांची खरी गरज सिद्ध करण्यासाठी सादर केलेल्या साक्षीपुराव्यांच्या ग्राह्यतेविषयी आहे. सुलभा यांनी दाखल केलेल्या पुराव्यांच्या प्रतिज्ञापत्रात तिच्या कायदेशीर पार्श्वभूमीमुळे मुखत्यारनामा तिच्या बाजूने निष्पादित करण्यात होता, असा युक्तिवाद करत वकील म्हणून तिचा व्यवसाय घोषित करण्यात आला आहे. १९ ऑगस्ट २००३ रोजी चार वर्षे वकिली व्यवसायात असल्याची कबुली तिने उलटतपासणीत दिली. प्रस्थापित मुख्यत्याऱ्याच्या व्यवसायामुळेच श्री. पटवर्धन यांनी केवळ कुटुंबाचा व्यवसाय सांभाळणे अशक्य असल्याचा ठाम युक्तिवाद केला आहे.

१४) वैयक्तिक ज्ञानाशी संबंधित प्रकरणा संदर्भात प्रस्थापित मुखत्याऱ्याद्वारे पुरावे सादर करण्या संदर्भातील कायद्याचा सारांश सर्वोच्च न्यायालयाने मान कौर (उपरोल्लेखित) या

प्रकरणामध्ये दिला आहे, ज्यात परिच्छेद १८ मध्ये खालीलप्रमाणे मत व्यक्त करण्यात आले आहे.

१८. आता आपण सोयीसाठी, वैयक्तिक ज्ञानाशी संबंधित बाबींसह पुरावे कोणी द्यायचे याची भूमिका थोडक्यात सांगू शकतो

(ए) ज्या मुख्यात्यापत्र धारकाने वादपत्रावर स्वाक्षरी केली आहे आणि दावा दाखल केला आहे, परंतु व्यवहाराची वैयक्तिक माहिती नाही, तो केवळ मुखत्यारनाम्याच्या वैधतेबद्दल आणि दावा' दाखल करण्याबद्दल औपचारिक पुरावे देऊ शकतो.

(बी) मुखत्यारपत्र देणाऱ्याने दिलेल्या मुखत्यारनाम्याच्या अनुषंगाने मुखत्यारपत्र धारकाने कोणतीही कृती केली असेल किंवा कोणतेही व्यवहार, व्यवहार हाताळले असतील तर ती कृती किंवा व्यवहार सिद्ध करण्यासाठी साक्षीदार म्हणून त्याची तपासणी केली जाऊ शकते. अशा कृतींची व अशा व्यवहारांची वैयक्तिक माहिती एकट्या मुखत्यारपत्र धारकाला असेल, मुखत्यारपत्र देणाऱ्याला नसेल, तर त्या कृती व व्यवहार सिद्ध करावयाचे असतील तर मुखत्यारपत्र धारकाची तपासणी केली जाईल.

(सी) मुखत्यारपत्र देणाऱ्याने केलेल्या कृती किंवा मुखत्यारपत्र देणाऱ्या चे व्यवहार किंवा व्यवहार, ज्याचे वैयक्तिक ज्ञान एकट्या मुखत्यारपत्र देणाऱ्याला आहे, त्याबद्दल मुखत्यारपत्र धारक आपल्या मुखत्यारपत्र देणाऱ्याच्या जागी साक्ष देऊ शकत नाही किंवा पुरावा देऊ शकत नाही.

(डी) जेथे मुखत्यारपत्र देणाऱ्याने कोणत्याही वेळी वैयक्तिकरित्या व्यवहार हाताळला नाही किंवा व्यवहार केला नाही किंवा व्यवहारात भाग घेतला नाही आणि व्यवहाराची वैयक्तिक माहिती नाही आणि जिथे संपूर्ण व्यवहार मुखत्यारपत्र धारकाने हाताळला आहे, तेथे केवळ मुखत्यारपत्र धारक व्यवहारासंदर्भात साक्ष देऊ शकतो. प्राधिकृत व्यवस्थापक/मुखत्यारपत्र धारक किंवा परदेशात राहणाऱ्या व्यक्तींच्या माध्यमातून व्यवसाय करणाऱ्या मुखत्यारपत्र धारकांच्या बाबतीत हे वारंवार घडते.

(इ) जेथे संपूर्ण व्यवहार एखाद्या विशिष्ट मुखत्यारपत्र धारकामार्फत केला गेला असेल, तेथे व्यवहार सिद्ध करण्यासाठी मुखत्यारपत्र देणाऱ्याला त्या मुखत्यारपत्र धारकाची तपासणी करावी लागते, वेगळ्या किंवा नंतरच्या मुखत्यारपत्र -धारकाची नाही.

(एफ) जेथे व्यवहाराच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर वेगवेगळ्या मुखत्यारपत्र धारकांनी हे प्रकरण हाताळले होते, त्या वेगवेगळ्या टप्प्यांवर काय घडले याचे पुरावे द्यायचे असतील तर सर्व मुखत्यारपत्र धारकांची तपासणी करावी लागेल.

(जी) जिथे कायद्याने कार्यवाहीतील वादी किंवा इतर पक्षकाराला त्याच्या मनःस्थितीच्या किंवा "आचरणाच्या" संदर्भात एखादी गोष्ट प्रस्थापित करणे किंवा सिद्ध करणे आवश्यक आहे किंवा विचार केला आहे, तेथे सामान्यत: संबंधित व्यक्तीला पुरावा द्यावा लागतो, मुखत्यारपत्र धारकाला नाही. आपल्या भाडेकरूला त्याच्या "खऱ्याखुल्या" गरजेच्या आधारावर बेदखल करण्याची मागणी करणारा घरमालक आणि विशिष्ट कामगिरी शोधणारा खरेदीदार ज्याला आपली "तयारी आणि इच्छा " दाखवावी लागते तो या श्रेणीत मोडतो. तथापि, या आवश्यकतेला मान्यताप्राप्त अपवाद आहे. जेथे एखाद्या पक्षकाराचे सर्व व्यवहार मुखत्याराद्वारे पूर्णपणे व्यवस्थापित, चालविले जातात आणि देखरेख एखाद्या मुखत्याराद्वारे केली जाते (जो कुटुंबातील जवळचा सदस्य असू शकतो), अशा मुखत्यारयाचे खऱ्या किंवा "तयारी आणि इच्छा" च्या संदर्भानेदेखील स्वीकारणे शक्य होऊ शकते. केवळ आपल्या जोडीदाराचा

कारभार सांभाळणारे पती /पत्नी केवळ वृद्ध व विकलांग आई-वडिलांचा कारभार सांभाळणारा मुलगा/मुलगी परदेशात राहणाऱ्या मुलाचा/मुलीचा कारभार सांभाळणारे वडील/आई अशी मुखत्यारपत्र धारकांची उदाहरणे आहेत.

( विशेष जोर

आणि अधोरेखित करून दिला)

१५) मान कौर या प्रकरणामधील निर्णयाच्या परिच्छेद १८ (जी) मध्ये, भाडेकरूला बेदखल करण्याची मागणी करणाऱ्या घरमालकाच्या समर्थनार्थ पुरावे सादर करणाऱ्या प्रस्थापित मुखत्याऱ्याचे उदाहरण सर्वोच्च न्यायालयाने हाताळले आहे, जे सध्याच्या कार्यवाहीतही आहे. घरमालकाला स्वत:च्या गरजेविषयी वैयक्तिक माहिती असल्याने त्याने/तिनेच स्वत:चे पुरावे सादर करून खरी गरज सिद्ध करणे आवश्यक आहे, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे. सर्वोच्च न्यायालयाने मात्र या तत्त्वाला अपवाद म्हणून मान्यता दिली आहे, जिथे पक्षकाराचे व्यवहार कुटुंबातील जवळचे सदस्य असलेल्या मुखत्याराद्वारे पूर्णपणे हाताळले, चालवले आणि सांभाळले जातात.

सर्वोच्च न्यायालयाने केवळ आपल्या जोडीदाराचा कारभार सांभाळत असणाऱ्या पती/ पत्नीची उदाहरण दिले आहे. अशा प्रकारे, ज्या प्रकरणात पती/ पत्नी जोडीदाराचे व्यवहार सांभाळत असल्याचे आढळले आणि जोडीदाराच्या प्रामाणिक आवश्यकता संदर्भात पुरावे सादर करण्याच्या स्थितीत असेल तर तो / ती घरमालकाचे प्रस्थापित मुखत्यार म्हणून पुरावे सादर करू शकतो/शकते .

१६) सध्याच्या प्रकरणात सध्याचे दुकान आणि दाव्यातील दुकान एकत्र करून स्वतंत्र दागिन्यांचा व्यवसाय सुरू करण्यासाठी वादी तसेच त्यांच्या दोन मुलांच्या खऱ्या गरजेची बाजू मांडण्यात आली. सुलभा ही वादी यांची सून आणि दिपक यांची पत्नी आहे. दिपकची खरी आवश्यकताही वादपत्रात मांडण्यात आली होती. त्यामुळे दिपकची पत्नी असल्याने सुलभाला आपल्या नवऱ्याची स्थिती /गरज कळणे बंधनकारक आहे. सुलभाने केवळ वकिली व्यवसाय करत होती यांचा अर्थ दागिन्यांचा व्यवसाय वाढविण्यासाठी कुटुंबातील सदस्यांच्या गरजेबद्दल ती अनभिज्ञ असेल असे नाही. वादी, दिपक आणि प्रफुल्ल एकाच घरात एकत्र राहत असल्याचे साक्षीपुराव्यात समोर आले आहे. सुलभा यांनी प्रफुल्लच्या बेरोजगारीचे साक्षीपुरावे दिले आहेत. दिडशे चौरस फुटांच्या लहान जागेतून दागिन्यांचा व्यवसाय चालवताना पतीला सामोरे जाणाऱ्या अडचणी तिला माहीत

असणे भाग आहे . त्यामुळे तत्कालीन विद्यमान शोरूमचा आकार वाढवून स्वतंत्र दागिन्यांचा व्यवसाय सुरू करण्याच्या कुटुंबाच्या गरजेविषयी सुलभा यांना वैयक्तिक माहिती नव्हती, असे सध्याच्या प्रकरणातील वस्तुस्थितीत म्हणता येणार नाही.

१७) सर्वोच्च न्यायालयाने मान कौर या प्रकरणा मध्ये वापरलेल्या 'पत्नी केवळ तिच्या/त्याच्या जोडीदाराचे व्यवहार पाहायची ' या शब्दप्रयोगाचा काटेकोर अर्थ असा काढता येणार नाही की पत्नी आपल्या पतीच्या सर्व व्यवहारांवर पूर्ण किंवा पूर्णपणे नियंत्रण ठेवते. ज्या विषयाचे पुरावे दिले जात आहेत, त्या संदर्भात 'व्यवहारांची व्यवस्था' समजून घेण्याची गरज आहे. उदाहरणार्थ, पती वाटाघाटींचा भाग बनून पत्नीद्वारे मालमत्ता खरेदीच्या व्यवहारात भाग घेतो आणि विक्रेत्या बरोबर झालेल्या सर्व परस्पर कियांची त्याला माहिती असते, तो त्याच्या पत्नीच्या इतर क्रियाकलापांचा भाग नसला तरीही त्या व्यवहारात त्याच्या पत्नीचा व्यवहार हाताळणारी व्यक्ती म्हणून मानला जाईल. नवरा या नात्याने साधारणपणे व्यवहार पूर्ण करण्यासाठी पत्नीकडे उपलब्ध असणारी साधनसामुग्री आणि ती पूर्ण करण्यासाठी तिची मनःस्थिती जाणून घेणे त्याला बंधनकारक असते. त्यामुळे ' व्यवहारांची केवळ व्यवस्था' या शब्दाचा अर्थ पती/पत्नीच्या व्यवसायधंद्या विषयी प्रत्येक छोट्या-छोट्या तपशिलाचे ज्ञान जोडीदाराला असणे आवश्यक आहे, असा होत नाही. खऱ्या गरजेच्या संदर्भात, वादीने 'आवश्यकता'

अस्तित्वात असणे आवश्यक आहे, ती आवश्यकता दोन्ही म्हणजे खरी आणि वाजवी आहे आणि अधिक त्रासास कारणीभूत आहे. या बाबींची माहिती देण्यासाठी पत्नीला पतीच्या दागिन्यांच्या व्यवसायाची प्रत्येक छोटी-मोठी माहिती असणे आवश्यक नसते. कुटुंबाची नेमकी गरज काय आहे, याचे ज्ञान तिला असणे आवश्यक आहे. पतीच्या मन:स्थितीबद्दल ती साक्ष देऊ शकते. जोपर्यंत पत्नीला कुटुंबाच्या व्यवसायाविषयी आणि वादपत्रात व्यक्त केलेल्या गरजेबद्दल अजिबात माहिती नव्हती हे सिद्ध होत नाही, तोपर्यंत प्रस्थापित मुखत्यार म्हणून तिच्या साक्षीकडे पूर्णपणे दुर्लक्ष करता येणार नाही .

१८) प्रतिवादींनी सुलभाची सखोल उलटतपासणी केली. सुलभाच्या उलटतपासणी चे अवलोकन असे दर्शविते की तिला गुजरी येथील चिपाडे कुटुंबाचा संयुक्त कौटुंबिक व्यवसाय आणि तो वादी यांचा मुलगा, भाऊ व पुतण्या चालवत होता, याची संपूर्ण माहिती तिला होती. केशव मार्तंड चिपाडे या कंपनीच्या तीन पिढ्यांपासून सुरू असलेल्या व्यवसायाची त्यांना माहिती आहे. भागीदारांची नावे विचारली असता तिने ती उघड केली आहेत. तिने विविध भागीदारांच्या हिस्सा देखील उघड केला आहे . कंपनीचे प्राप्तिकर विवरणपत्र तसेच भागीदारांच्या वैयक्तिक परताव्याबाबत त्यांनी साक्ष दिली . त्यांनी कंपनीच्या उलाढालीबद्दल अनभिज्ञता व्यक्त केली नाही, परंतु ही उलाढाल एक कोटी रुपयांपेक्षा जास्त असल्याचा सूचक प्रश्न तिने फेटाळून लावला. ज्या दुकानात कंपनीचा

व्यवसाय सुरू होता , त्या दुकानाच्या आकाराबाबत तिने पुरावे दिले. ज्वेलरी व्यवसायातील प्रफुल्लच्या अनुभवाचे पुरावे त्यांनी दिले. त्यानंतर दावा जागा कोणत्या संरचनेत आहे, तसेच ज्या दुकानात तिचा पती व्यवसाय करत होता, त्या दुकानाच्या आकाराबाबत तिची सखोल उलटतपासणी केली असता, दिपकने १० ते १५ वर्षे व्यवसाय केल्याचे तिने सांगितले. तिच्या उलटतपासणीच्या वेळी त्यांनी पालिकेच्या करांबाबतच्या प्रश्नांना उत्तरे दिली. सुलभाच्या साक्षीवरून तिला केशव मार्तंड चिपाडे या भागीदारी संस्थेने तसेच पतीने वैयक्तिकरित्या चालविलेल्या व्यवसायाची सखोल माहिति असण्याचे दिसून येईल. तिची केवळ कायदेशीर पार्श्वभूमी आणि चार वर्षे वकिली करणारा व्यवसाय हा तिला कुटुंबाच्या व्यवसायाविषयी काहीच माहिति नाही आणि कुटुंबातील सदस्यांच्या गरजेबद्दल साक्ष देण्याच्या स्थितीत नाही, असे म्हणण्याचा एकमेव आधार असू शकत नाही. किंबहुना मान कौर मधील निकालाचे गुणोत्तर लागू करून माझ्या मते सुलभा वादीच्या वतीने साक्षी पुरावे सादर करण्यास पूर्णपणे सक्षम होती.

१९) न्यायचौकशी आणि अपीलीय न्यायालयाने रामकूबाई (उपरोल्लेखित) मधील निर्णयावर भरवसा ठेवला आहे, ज्यामध्ये परिच्छेद ९ मध्ये खालीलप्रमाणे निर्णय देण्यात आला आहे:-

आम्ही वर आधीच नोंद केले आहे की, घरमालकीणीच्या खऱ्या आवश्यकतेचा आधार न्यायचौकशी न्यायालयाने स्वीकारला होता, परंतु अपीलीय न्यायालयाने तो नाकारला होता आणि उच्च न्यायालयाने त्यास पुष्टी दिली. आपल्या दाव्याचे समर्थन करण्यासाठी घरमालकीण स्वत: साक्षीदारांच्या कठड्यात न आल्याने अपिलीय न्यायालय डगमगून गेले. अपिलीय न्यायालयाने हे मान्य केले नाही की तिचा मुलगा भिकचंद जो तिचा कुलमुखत्यारपत्रधारक होता आणि ज्याच्या फायद्यासाठी हा व्यवसाय उभारायचा आहे, तो वैयक्तिक गरजेच्या वादाचे समर्थन करण्यासाठी साक्षीदारांच्या कठड्यात आला होता. अपिलीय न्यायालयाचे असे मत होते की खरी आवश्यकता ही प्रथमतः एक मानसिक स्थिती आहे आणि कदाचित ती आणखी काही असू शकते आणि ती केवळ घरमालकीणच प्रस्थापित करू शकते. मोहता यांच्या बाबतीत प्रामाणितपणे आपण हे लक्षात घेतले पाहिजे की, अपीलीय न्यायालयाच्या त्या युक्तिवादाचे समर्थन केले जाऊ शकत नाही, हे त्यांनी मान्य केले.

२०) हे खरे आहे की रामकुबाई (उपरोल्लेखित ) या प्रकरणात ज्या मुलाच्या बाजूने मुखत्यारपत्राचे निष्पादन करण्यात आले त्या मुलाची गरजही प्रस्थापित करण्यात आली. मात्र, खरी गरज ही एक मनःस्थिती आहे, जी केवळ घरमालकीणच प्रस्थापित करू

शकते, हा अपिलीय न्यायालयाचा निष्कर्ष सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावला आहे. काहीही असो, मान कौर (उपरोल्लेखित) प्रकरणातील नंतरच्या निर्णयात सर्वोच्च न्यायालयाने पतीच्या वतीने पतीच्या वतीने तिच्या वैयक्तिक माहितीतील बाबींबाबत पुरावे सादर करण्याचा अपवाद मान्य केला आहे. प्रस्तुत प्रकरणात सुलभा यांना कुटुंबातील सदस्यांच्या व्यवसायाविषयी तसेच त्यांच्या गरजा या विषयी संपूर्ण वैयक्तिक माहिती होती. त्यामुळे ती वादीच्या वतीने साक्षी पुरावे सादर करण्यास पूर्णपणे सक्षम आहे. तिच्या पुराव्यांवर अवलंबून राहून न्यायचौकशी आणि अपिल न्यायालयाने कोणतीही अधिकारितेची चूक केलेली नाही.

२१) सुलभाचे पुरावे फेटाळण्याचा पुनरीक्षण अर्जदाराचा युक्तिवाद मागे घेतल्यानंतर, तिने दिलेले साक्षीपुरावे वादी आणि त्याच्या दोन मुलांच्या खऱ्या आवश्यकतेचे अस्तित्व दर्शवितात की नाही हे ठरविण्याचा पुढचा प्रश्न आहे . घरमालक हा त्याच्या खऱ्या गरजेचा सर्वोत्तम न्यायाधीश आहे आणि भाडेकरू त्याच्या अटी ठरवू शकत नाही, हा प्रस्थापित कायदा आहे. सध्याच्या प्रकरणात वादी व त्यांची दोन मुले दागिन्यांचा व्यवसाय करतात. दिपक १५० चौरस फुटांच्या छोट्याशा दुकानात स्वत:चा स्वतंत्र व्यवसाय चालवत होता, हे पुराव्यांवरून सिद्ध झाले आहे. दावा दाखल करण्याच्या तारखेला प्रफुल्ल यांची बेरोजगारीही स्पष्टपणे सिद्ध झाली आहे. दिपकने या छोट्या

शोरूमचे दावा जागेत विलीनीकरण करून त्याचा विस्तार करण्याची तक्रारदारांनी व्यक्त केलेली इच्छा खरी वाटते आणि पुनरीक्षण अर्जदारांनी सुचविल्याप्रमाणे केवळ काल्पनिक इच्छा म्हणून ती नाकारता येणार नाही. भाडेकरूंच्या ताब्यात असलेल्या अतिरिक्त जागेचा ताबा घेऊन वाढत्या कुटुंबातील सदस्यांना व्यवसाय विस्ताराची अपेक्षा असणे स्वाभाविक आहे. शेवटी हे घरमालकाचे स्वतःचे दुकान आहे आणि भाडेकरू घरमालकाच्या दुकानाचा आनंद घेत असताना त्याने इतर जागेचा शोध घेणे अपेक्षित नाही. माझ्या मते, फिर्यादीची स्वतःची आणि त्याच्या दोन मुलांची गरज खरी आणि रास्त आहे.

२२) दिपकने २०१७ मध्ये शेजारचे दुकान बंद केले आहे, असे श्री. पटवर्धन यांनी सुचवण्याचा प्रयत्न केला आहे. या समर्थनार्थ अर्जदारांच्या वतीने अतिरिक्त प्रतिज्ञापत्र दाखल करण्यात आले आहे. अर्जदारांच्यावतीने २२ ऑगस्ट २०२३ रोजी दाखल करण्यात आलेले प्रतिज्ञापत्र महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी लिमिटेडच्या (महावितरण) वीज वापर पुरवठ्याच्या ग्राहक खातेवहीवर अवलंबून आहे. मात्र, महावितरणने १७ ऑगस्ट २०२३ रोजी पत्राद्वारे दिलेली माहिती दिपक च्या ताब्यातील जागेशी संबंधित नसल्याचे आढळून आले आहे. वादीने चुकीची माहिती दिल्याचा आरोप झाल्यानंतर पुनरीक्षण अर्जदारांनी स्वतःला दुरुस्त केले आणि त्यानुसार २१ मार्च २०२४ रोजी पुढील प्रतिज्ञापत्र

दाखल करून दिपकच्या ताब्यात असलेल्या दुकानाशी संबंधित दुसऱ्या ग्राहक खातेवहीची प्रत सादर केली. सदर ग्राहक खातेवही २०१७ च्या संपूर्ण वर्षातील दुकानातील विजेचा वापर दाखवते. त्यामुळे २०१७ मध्ये दुकाने बंद केल्याच्या आरोप कोणत्याही परीक्षेला उतरू शकेल असा नाही. या स्थितीला सामोरे जाताना श्री. पटवर्धन यांनी २०२१ नंतर वापर नाही, असा युक्तिवाद केला आहे.

२३) वादी यांचे निधन झाले आहे. श्री. पटवर्धन यांनी आपली बाजू उचित रीतीने या तथ्यापर्यन्त ताणून नाही मांडली की वादींनी आपल्या दोन्ही मुलांची गरजही मांडण्यात आली असल्याने वादी यांच्या निधनामुळे आवश्यकतेवर परिणाम झाला आहे. दिपकने शेजारचे दुकान पूर्णपणे बंद केल्याचा आरोप क्षणिक योग्य मानला तरी या घटनेचा बेदाखलीच्या हुकूमनाम्यावर फारसा परिणाम होणार नाही. हा दावा २००२ मध्ये सुरू करण्यात आला होता आणि आतापर्यंत २२ वर्षे उलटून गेली आहेत आणि या २२ वर्षांत दिपकला १५० चौरस फुटांच्या छोट्याशा दुकानात आपला व्यवसाय करणे आवश्यक होते कारण अपिलीय न्यायालयाने आणि या न्यायालयाने दिलेल्या स्थगितीमुळे या हुकूमनाम्याची अंमलबजावणी करण्यास उशीर झाला. दावा जागेच्या ताबा मिळाल्यानंतर दिपक आणि प्रफुल्ल दोन्ही दुकाने एकत्र करून मोठ्या शोरूममध्ये आपला व्यवसाय करू शकतात.

२४) असे असले तरी मूळ वादीचा मृत्यू झाल्याच्या घटना किंवा दिपकला छोट्या आवारात दागिन्यांचा व्यवसाय चालविण्यात येणाऱ्या अडचणींमुळे मूळ खऱ्या गरजेवर पूर्णपणे दुर्लक्ष झाल आहे, असे म्हणता येणार नाही . तसेच, या न्यायालयासमोर दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्राद्वारे दिलेली माहिती त्याच्या समर्थनार्थ कोणत्याही पुराव्या अभावी विचारात घेतली जाऊ शकत नाही. या न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्यात आलेल्या विद्यमान घटना म्हणजे वादीच्या मूळ खऱ्या आवश्यकतेवर पूर्णपणे विपरीत परिणाम करणे असा नाही, जेणेकरून अतिरिक्त पुरावे नोंदविण्यासाठी कार्यवाही परत पाठविणे. त्यामुळे माझ्या मते सध्याच्या पुनरीक्षण अर्जावर निर्णय घेताना विद्यमान घटनांचा विचार करता येणार नाही.

२५) वरील चर्चेचा सारांश असा आहे की, न्यायचौकशी न्यायालय आणि अपीलीय न्यायालयाने वादीने दाखल केलेल्या दाव्यात योग्यरित्याच हुकूमनामा दिलेला आहे. वादी यांच्या दोन्ही मुलांना दागिन्यांच्या व्यवसायाचे ज्ञान व अनुभव आहे. वादी यांचा एक मुलगा दिपक हा शेजारच्या १५० चौरस फुटांच्या दुकानातून दागिन्यांचा व्यवसाय करीत होता. शेजारच्या जागेत या व्यवसायाचा विस्तार करण्याची त्यांची गरज काल्पनिक इच्छा मानता येणार नाही, जी प्रत्यक्षात आणणे अशक्य आहे. संबंधित वेळी प्रफुल्ल बेरोजगार होता आणि त्या जागेत प्रफुल्लसाठी व्यवसाय सुरू करण्याची वडिलांची इच्छा

असणे अनैसर्गिक नव्हते. जरी न्यायचौकशी न्यायालयाने प्रामुख्याने प्रफुल्लच्या खऱ्या गरजेवर लक्ष केंद्रित केले होते , (जरी त्यांनी वादी किंवा दिपक यांच्या खरी आवश्यकता कधीच नाकारली नाही) अपीलीय न्यायालयाने वादी आणि त्याच्या दोन मुलांच्या एकत्रित गरजेचा योग्य विचार केला आहे. संहितेच्या आदेश ४१ नियम २२ आणि ३३ अन्वये अधिकारक्षेत्राचा वापर करून तसे करण्याचा अधिकार देण्यात आला होता. त्यामुळे दिपकच्या खऱ्या गरजेलाही अनुकूलता शोधण्यात अपिलीय प्राधिकरणाकडून कोणतीही चूक झाली आहे, असा युक्तिवाद करता येणार नाही. त्यामुळे न्यायचौकशी आणि अपिलीय न्यायालयांनी नोंदवलेल्या समवर्ती निष्कर्षांमध्ये कोणत्याही हस्तक्षेपाची आवश्यकता नाही.

२६) पुनरावलोकन अर्ज खचितच असफल ठरत आहे. त्यानुसार तो फेटाळला जातो. वादींना व्याजासह संपूर्ण जमा रक्कम काढण्याची मुभा देण्यात येते. पुनरीक्षण अर्जदारांना त्रयस्थ पक्षाचे हितसंबंध निर्माण न करण्याच्या अधिन दावा जागेचा ताबा रिकामा करण्यासाठी २८ फेब्रुवारी २०२५ पर्यंत मुदत देण्यात आली आहे.

[न्या. संदीप वि. मारणे ]

~~x-x-x-x-x-x~~

अस्वीकरण

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

-x-x-x-x-x-x-